**विभागाचे नाव :- कृषि विभाग**

| अ.क्र | प्रक्रिया स्थिती (Stages of Process Mapping | बाब | | माहिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| PC1 | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and | प्रक्रिया नाव | | कृषि समिती अभ्यास दौरा/ शेतकरी सहल जि.प. गटनिहाय आयोजित करणे. | |
| PC2 | | कार्यासन संकेतांक (उदा.आस्था1 लेखा 4) | | तांत्रिक - 6, जिल्हा परिषद निधी | |
| PP1 | ...या प्रस्तावित करणे (Process Proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी (maker) -पदनाम | | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP2 | | संदर्भिय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके, पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावे | | 1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार मा. जि.प. सर्वसाधारण सभा व कृषि समिती सभा योजनेच्या अंमलबजावणीस व अटी शर्तीस मान्यता देते.<br>2) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -32 यांचेकडील शासन निर्णय क्र. झेडपीए-2016/ प्र.क्र.56/ वित्त-9 , दिनांक 07/10/2017 नुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते. | |
| PP3 | | प्रस्तावासोबत (आवश्यक असल्यास) जोडावयाची कागदपत्रे उदा.विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी | लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे | शेतकरी अभ्यास दौरा आयोजित करत असताना शेतकऱ्यांकडुन 7/12 व 8 अ तलाठयाकडील उतारा घेण्यात येतो. | |
| | | | कार्यालयीन कागदपत्रे | 1) जिल्हा परिषद निधी अंतर्गत अंदाजपत्रक तरतुद पत्र.<br>2) कृषि समिती सभेची योजनेच्या अंमलबजावणीस व अटी-शर्तीस मान्यता.<br>3) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार मा.जि.प. सर्वसाधारण सभा/ मा.स्थायी समिती सभा/ विषय समिती सभा/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता आदेश.<br><br>4) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार र.रु.50.00 लक्षच्या वरील निधीस मा.जि.प. सर्वसाधारण सभा व र.रु.10.01 ते 50.00 लक्ष पर्यंतच्या निधीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व र.र. 10.00 लक्ष पर्यंत खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार तांत्रिक मान्यता आदेश.<br>5) कृषि समिती सदस्य अभ्यास दौरा / शेतकरी सहल जि.प. गटनिहाय जिल्हयात किंवा राज्यांतर्गत कृषि विद्यापिठे, कृषि क्षेत्रात भरीव कार्य करणारी स्थळे येथे मा. जि.प. सदस्य यांनी सुचित केलेनुसार आयोजित करण्यात येतात.<br>6) जिल्हा परिषद गटनिहाय शेतकरी सहलीचा लाभ जास्तीत-जास्त शेतक-यांना दयावा. प्रत्येक गटातील किमान 30 शेतकरी यांनी सहलीचा लाभ घेणे आवश्यक राहील.<br>7) शेतकरी सहली दरम्यान कृषि विद्यापिठा अंतर्गत संशोधित सुधारित औजारे, यंत्रे, कृषि पूरक उद्योगांना बी-बियाणे, पिक नमुने, नविन वाण तसेच कृषि क्षेत्रांतर्गत पाणलोट, जलसंधारण तसेच नामांकित संस्था यांनी राज्यांतर्गत आयोजित केलेले कृषि प्रदर्शनास भेट देणे याबाबतची माहिती शेतकऱ्यांना होण्यासाठी आयोजित करण्यात येतात.<br><br>8) प्रत्येक जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करणेसाठी प्रत्येक गटासाठी रु.30,000/- याप्रमाणे अनुदान गट स्तरावर वितरीत करणेत येते.<br>9) गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत विहीत कार्यपध्दतीचा अवलंबन करुन अभ्यास दौऱ्यासाठी वाहनाची उपलब्धता करण्यात येते.<br>10) गट स्तरावरुन शेतकरी अभ्यास दौरा आयोजित केलेनुसार गटाकडुन निधीची मागणी करण्यात येते. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रक्रि | | 11) प्राप्त प्रस्ताव व कृषि समिती सभेच्या मंजुरीनुसार अनुदान गटस्तरावर वर्ग करणेत येते.<br>12) गट स्तरावरुन लेखा संहितेचा विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन संबंधित व्यवस्था करणारे ठेकेदार यांना अनुदान वर्ग करणेत येते. | |
| PP4 | | प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परिक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प, विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | 1) कृषि समिती सदस्य अभ्यास दौरा / शेतकरी सहल जि.प. गटनिहाय जिल्हयात किंवा राज्यांतर्गत कृषि विद्यापिठे, कृषि क्षेत्रात भरीव कार्य करणारी स्थळे येथे मा. जि.प. सदस्य यांनी सुचित केलेनुसार आयोजित करण्यात येतात.<br>2) जिल्हा परिषद गटनिहाय शेतकरी सहलीचा लाभ जास्तीत-जास्त शेतक-यांना दयावा. प्रत्येक गटातील किमान 30 शेतकरी यांनी सहलीचा लाभ घेणे आवश्यक राहील.<br>3) शेतकरी सहली दरम्यान कृषि विद्यापिठा अंतर्गत संशोधित सुधारित औजारे, यंत्रे, कृषि पूरक उद्योगांना बी-बियाणे, पिक नमुने, नविन वाण तसेच कृषि क्षेत्रांतर्गत पाणलोट, जलसंधारण तसेच नामांकित संस्था यांनी राज्यांतर्गत आयोजित केलेले कृषि प्रदर्शनास भेट देणे याबाबतची<br>4) जि.प.निधी अंतर्गत कृिषि समिती सदस्य अभ्यास दौरा / शेतकरी सहल आयोजित करीत असताना विषय समितीने मंजुरी दिलेनुसार लागणारे आवश्यक अनुदान गटस्तरावर वितरित करणेबाबत कार्यवाही करावी. | |
| PP5 | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पस/ग्रापं/जि.प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे/ महामंडळे/ मनपा/नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडुन प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस. | 1) शेतकरी सहल आयोजनाबाबत गट विकास अधकारी योंचेमार्फत मा. जि.प.सदस्य यांच्याशी चर्चा करुन अभ्यास दौरा आयोजन करावयाचे ठिकाण निश्चित करण्यात येऊन अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो.<br>2) कृषि विभागाशी सलग्न इतर विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांमार्फत शेतकरी अभ्यास दौऱ्यादरम्यान याख्याने व प्रक्षेत्र भेटी आयोजित केली जातात. तसेच कृषि विद्यापिठाकडील संशोधित विविध पिकांचे नव-नविन वाण याबाबतची माहिती घेणेसाठी प्रक्षेत्रास भेट दिली जाते. तसेच कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहीत करणेसाठी आधुनिक यंत्रे-सामुग्री याबाबत देखील विद्यापिठात प्रात्यक्षिक दाखवुन शेतकऱ्यांना माहिती दिली जाते. | |
| PP6 | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ./क.प्र.अ. / पर्यवेक्षीय अधिकारी) | कृषि अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (सर्वसाधारण) | |
| PP7 | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | - | |
| PA1 | प्रक्रिया मंजुरी (Process approval) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख/ | कृषि विकास अधिकारी | |
| PA2 | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | कृषि समिती सभा | |
| PA3 | | Endorsement (समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ/ अति मुकाअ/ संबंधित खातेप्रमुख) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| PM1 | प्रक्रि या त्रुटी शोध | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | - | |
| PI1 | प्रक्रिया सुधारणा(Process improvization) | अचुकता वेळेची बचत, मनुष्यबळ कार्यक्षम वापर, पारदर्शकता याकरीता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोगा उपप्रक्रिया/ बाबी | संगणक प्रणालीचा योग्यप्रकारे वापर. | |
| PI2 | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | - | |
| PI3 | | मुळ संकल्पना, उद्देश, लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करावयाच्या बाबी | - | |